
## सिंधुदुर्ग जिल्हा कृषि प्रतिष्ठान, किर्लोस

ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग





# समृद्ध गाव प्रकल्प

लोकसहभागातून ग्राम विकास

गाव हे विकासाचे केंद्र

# प्रस्तावना



## समृद्ध गाव प्रकल्पाचे जनक

## ब्रिगे. सुधीर सावंत

अध्यक्ष, सिंधुदुर्ग जिल्हा कृषि प्रतिष्ठान

गाव हे विकासाचे केंद्र कधी होणार ? हा प्रश्न गांधीजींना पडला होता. ७० वर्ष भारताच्या स्वातंत्र्याला झाली, पण आपण गाव भकास करत चाललो आहोत. गावातील सर्व आकर्षण नष्ट करून लोकांना शहरात झोपडपट्ट्यांमध्ये रहायला धाडण्यात आले आणि कोरोनाच्या तावडीत अडकवण्यात आले. याचे परिणाम जगभर दिसत आहेत. सर्वात पुढारलेला देश आज सर्वात भयाण अवस्थेत आहे.

भारत स्वतंत्र झाला तेंव्हा ८०% लोक गावात होते. त्यांचा व्यवसाय शेती होता. भारत सुद्धा शेतीला उपयुक्त देश होता. ५२% जमीन शेतीलायक होती. १२ महिने सुर्य होता. वर्षाला ३ पीक घेण्याची क्षमता ह्या देशाची होती. दुसरीकडे अमेरिकेत १९% जमीन शेतीलायक होती. १८% चीन मध्ये होती. साहजिक या आणि इतर विकसित देशांनी उद्योगाला प्रगतीचे सूत्र मानले. जिथे जिथे उद्योग उभे राहिले तिथे तिथे शहरे वाढत गेली आणि जीवनशैली ही शहरी बनत गेली. बहुसंख्य लोक शहरात राहत असल्यामुळे राजकीय आणि आर्थिक धोरणे सुद्धा शहरी बनत गेली. विकासाचे तत्त्वज्ञान सुद्धा शहरी झाले किंवा उद्योगावर आधारित झाले. त्यामुळे शेतीला दुय्यम स्थान मिळाले. भारताचे राज्यकर्ते आणि तत्त्वज्ञांनीसुद्धा ऑक्सफर्ड, केंब्रिजमध्ये शिकलेले होते. ज्याप्रमाणे आपण ब्रिटीशांचे कायदे भारतात लागू केले त्याचप्रमाणे आर्थिक विकासाचे तत्वज्ञान सुद्धा इंग्लंडमधील लागू केले. त्यामुळे भारतात शेतीला नगण्य स्थान मिळाले. ग्रामीण भारताची अधोगती होत गेली व देशात आर्थिक विषमता प्रचंड वाढली. शहरातील निवडक लोक प्रचंड श्रीमंत झाले व गावातील लोक गरीब होत गेले. देशात संपत्ती वाढून सुद्धा ती शहरातल्या एका विशिष्ट गटाकडे गेली आणि शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ आली. जर भारताने गांधीजींच्या सांगण्यावरून शेतीला प्रथम स्थान दिले असते आणि उद्योगाला दुय्यम स्थान दिले असते तर भारत जगाचे अन्नाचे भांडार झाले असते आणि आज जगात सर्वात विकसित देश होण्याचा महामार्ग खुला झाला असता. त्यासाठी गाव हे विकासाचे आणि नियोजनाचे केंद्र बनले पाहिजे.

गेली ७० वर्ष नियोजनाचे घोडे गाव सोडून शहराकडे उधळले होते. महाकाय शहरे निर्माण झाली. दाटीवाटीने लोक राहू लागले. तरुण शहराकडे धावू लागले. जगातील खनिज, जंगले, निसर्ग उद्धवस्त करुन शहरी जीवन आणखी सुखमय, विलासी बनवण्यात माणुसकी जळून गेली. म्हणून वेळ आली आहे की प्राप्त परिस्थिती बदलण्यासाठी, आनंदी जीवनाचे खरे रहस्य उलगडण्यासाठी एक नवीन दिशा घेऊन मानवी जीवन सुखी आणि समृद्ध केले पाहिजे.

जीवनाची संकल्पना आनंद आणि समृध्दी आहे. गावांचा सामुदायिक विकास करण्याच्या दृष्टीने सिंधुदुर्ग जिल्हा कृषि प्रतिष्ठान, किर्लोस या संस्थेने पुढाकार घेतलेला आहे. समृद्ध गाव हाच उद्देश नजरेसमोर ठेवून आम्ही स्थानिक आमदार, लोक प्रतिनिधी, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, मुंबई मंडळ, कृषि अधिकारी, शिक्षक, आरोग्य सेविका, बचत गट महिला प्रतिनिधी, गावातील सक्रीय लोक यांच्या उपस्थितीत गावांमध्ये अनेक बैठका घेतल्या. बैठकांमध्ये गावामध्ये आनंदी आणि समृद्ध समाज कसा बनवता येईल यावर चर्चा करुन एक विकास आराखडा बनवला आहे. चर्चेअंती गावातील वरील सर्व घटकांना एकत्रित करुन एक गाव विकास कमिटी स्थापन करण्याचे ठरविण्यात आले. समृद्ध गाव ही संकल्पना यशस्वी व्हायची असेल तर गावातील लोकांचा प्रभावी सहभाग अपेक्षित आहे. सिंधुदुर्ग जिल्हा कृषि प्रतिष्ठान ही संस्था गावामध्ये वेळोवेळी येऊन शेती उत्पादन, फळ प्रक्रीया, बाजारपेठ अशाप्रकारच्या वेगवेगळ्या विषयांवर राज्य व केंद्र शासनाच्या विविध विभागांचे सहाय्य घेऊन प्रशिक्षण व मार्गदर्शन करत आहे. सिंधुदुर्ग जिल्हा कृषी प्रतिष्ठान ही संस्था समृद्ध गाव योजनेत एक दुवा म्हणून काम करत आहे. याचबरोबर गावची ग्रामपंचायत, स्थानिक गाव समिती, मुंबई मंडळ, लोक प्रतिनिधी यांनी समृद्ध गावाचा आराखडा कार्यान्वित करण्यासाठी शासन, कंपन्या, सामाजिक संस्था यांच्या माध्यमातून निधी उभारण्याच्या कामात सहभाग घेणे अपेक्षित आहे.

समृद्ध गाव प्रकल्पाचे उद्दिष्ट गावातील प्रत्येक व्यक्तीला रोजगार उपलब्ध करून देणे व प्रत्येकाला स्वावलंबी करणे हे आहे. दैनंदिन गरजेच्या वस्तु गावातच बनवण्याची व्यवस्था बनत आहे. त्यायोगे गावातील पैसा गावातच ठेवणे आवश्यक आहे. बाहेरचा पैसा गावात आला पाहिजे. म्हणून गावातील तयार माल बाहेर विक्रीला गेला पाहिजे. नैसर्गिक शेती पद्धतीच्या माध्यमातून शेतीतील उत्पादन खर्च कमी करणे. रासायनिक खते आणि किटकनाशक गावातून तडीपार केली पाहिजेत. त्याचबरोबर गावातील पिकांच्या स्थानिक जातींचे संवर्धन करून, औषधी वनस्पतींचे देखील उत्पादन केले पाहिजे. त्यातून गावातील प्रत्येकाचे आरोग्य चांगले राहण्यासाठी व्यवस्था करणे आवश्यक आहे. गावातील नैसर्गिक साधन संपत्तीचे संवर्धन करून गावातील पिण्याचे व सिंचनाचे पाणी उपलब्ध करून पर्यावरणाचे रक्षण केले पाहिजे.

तसेच योग व क्रीडा यांच्या सोयी सुविधा निर्माण करणे हे आपले कर्तव्य आहे. प्रत्येक स्त्रीने व्यायाम केलाच पाहिजे. सकाळी महिलांनी एकत्र येऊन योगा करावा किंवा खेळ खेळावा. स्त्रियांनी हे करणे म्हणजे ग्रामीण जीवनात आश्चर्य वाटण्यासारखे आहे. पण सुरुवातीला कुठलीही नवीन आणि चांगली प्रथा हास्याचा विषय होतो. पण त्याला न जुमानता आपल्यासाठी आपणच बदल केला पाहिजे.

दुसरीकडे ग्रामीण जीवनातील आनंदच नष्ट झाला आहे. त्याला समृद्ध करण्यासाठी सांस्कृतिक चळवळीतून जीवन आनंदी करता येते. सणवार तर आहेतच पण ग्रामीण लोकांचे लक्ष कला–कौशल्याकडे वळविले पाहिजे. उदा. प्रत्येकाने एक तरी वाद्य वाजविले पाहिजे किंवा गायन केले पाहिजे, नाचले पाहिजे. त्यातून आनंद मिळाला पाहिजे. विकास म्हणजे नुसते काम नसते. आनंद आला पाहिजे नाहीतर जीवन रुक्ष होते, प्रभोधनाशिवाय दु:खी माणूस विकसित होत नाही. उत्पन्न व संस्कृतीतून मानवाला आध्यात्मिक बळ मिळते. ते जोपासण्याची गरज आहे.

गोसंवर्धन चळवळ व पशुसंवर्धन हे ग्रामीण जीवनाचा महत्वाचा भाग आहे. उत्पादन आणि उत्पन्नाचे साधन आहे. बचत गटाद्वारे गोशाळा, कुक्कुटपालन, शेळीपालन, मत्स्यपालन करणे सहज शक्य आहे. प्रत्येक गाव हे Wi-Fi युक्त पाहिजे, म्हणजे गावातील लोकांना जगाचे ज्ञान मिळविण्यासाठी काही अडचण येणार नाही. विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी वेगवेगळी साधने उपलब्ध करता येतील. गाव प्रगती पथावर नेण्यासाठी स्थानिक नेतृत्व निर्माण होईल. त्यासाठी इंटरनेटद्वारे जगाशी संवाद साधता येईल व मार्गदर्शन घेता येईल. गावातील शेतमालावर प्रक्रिया करण्याचे प्रशिक्षण घेता येईल व त्या आधारावर उद्योग सुद्धा उभारता येतील. कृषि माल व बचतगटांना बाजारपेठ उपलब्ध होईल. हे सर्वच तेव्हाच साध्य होईल, जेव्हा गावामध्ये विकासाची दिशा एकसंघपणे ठरेल. घाणेरड्या राजकारणाचा शिरकाव गावात होऊ देऊ नका. राजकीय पटलावर स्पर्धा होणारच पण तिचा परिणाम गावाच्या विकासावर कधीही होता कामा नये.



संकल्पना

समृद्ध गाव प्रकल्प आनंदी व समृद्ध गाव निर्माण करण्यावर केंद्रीत आहे. देशाचे लक्ष शहराच्या ठिकाणी उद्योग विकसित करण्यात गेले. परिणामत: ६०% भारतीय जनता ही खऱ्या विकासापासून वंचित राहिली. आधुनिक भारतात, उद्योगातून रोजगार मिळू शकत नाही. म्हणून गावातच रोजगार निर्माण झाला पाहिजे आणि गाव समृद्ध झाले पाहिजेत. करोना कांडातून हेच आपण शिकले पाहिजे.

समृद्ध गाव हा खऱ्या अर्थाने लोकांनी लोकांसाठी चालविलेला प्रकल्प आहे. गावामध्ये स्वत:साठी रोजगार निर्माण करणे. तसेच जीवन आनंदी बनविण्यासाठी ज्या गोष्टी आवश्यक आहेत. त्या गावातच निर्माण होण्यासाठी एकमेकांची मदत घेऊन त्यासाठी प्रयत्न करणे आणि त्यासाठी लागणाऱ्या कौशल्य विकास कार्यक्रमामध्ये प्रत्येकाने भाग घेणे अपेक्षित आहे. गावात त्याची अंमलबजावणी गावासाठी तयार झालेल्या गाव गटामार्फत पूर्ण करण्यात येईल. समृद्ध गावाची चळवळ यशस्वी होण्यासाठी सक्षम लोकांनी आपल्या आवडीच्या क्षेत्रामध्ये पुढे येऊन नेतृत्व करणे अपेक्षित आहे.

अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्र झपाट्याने वाढत आहे. आज भारतात सेवा क्षेत्र ६०%, उद्योगक्षेत्र २२% आणि कृषि क्षेत्र १८% आहे. परंतु रोजगाराच्या बाबतीत मात्र कृषि क्षेत्रावर ७०%लोक अवलंबून आहेत. याचा निष्कर्ष असा निघतो की रोजगार निर्मिती ही कृषि क्षेत्रात अडकलेल्या लोकांसाठी झाली पाहिजे. गावांमध्ये संपत्ती आणि संपन्नता आली पाहिजे. विज्ञान व तंत्रज्ञान संपत्ती निर्मितीचा पाया आहे. गावांमध्ये पैसा आणि संपत्ती कशामुळे निर्माण होईल व गावच्या नैसर्गिक साधन संपत्तीचे संवर्धन कसे होईल, हाच समृद्ध गाव योजनेचा विषय आहे.

महात्मा गांधीजींनी स्वयंपूर्ण खेड्याचे स्वप्न दाखवले होते. परंतु स्वातंत्रोत्तर काळात याचा गांभीर्याने विचार न केल्यामुळे गाव ओस पडू लागले व रोजगारासाठी माणसे शहराकडे धाव घेऊ लागली. त्यामुळे शहरांमध्ये सोयी सुविधा निर्माण करण्यासाठी ताण पडत आहे. लोकांचे जीवन सुद्धा असुरक्षित झालेले आहे. म्हणून ह्यावर उपाय म्हणून गाव हा केंद्रबिंदु मानून गाव स्वयंपूर्ण करणे ही काळाची गरज आहे. हे सर्व करण्यासाठी समृद्ध गाव ही संकल्पना सिंधुदुर्ग जिल्हा कृषि प्रतिष्ठानचे अध्यक्ष ब्रिगे. सुधीर सावंत यांनी प्रस्तावित केलेली आहे.

## समृद्ध गाव प्रकल्पाची तत्वे

- एकात्मिक शाश्वत ग्राम विकास
- स्वावलंबी जीवन
- आरोग्यदायी जीवन
- आनंदी जीवन
- सहजीवन

## समृद्ध गाव प्रकल्पाचा २१ कलमी कार्यक्रम

१. गावातील प्रत्येक व्यक्तीला रोजगार उपलब्ध करून देणे.

२. गावातील प्रत्येकाला स्वावलंबी करणे.

३. दैनंदिन गरजेच्या वस्तु गावातच बनवण्याची व्यवस्था करणे, त्यायोगे गावातील पैसा गावातच ठेवणे.

४. नैसर्गिक शेती पद्धतीच्या माध्यमातून शेतीतील उत्पादन खर्च कमी करणे.

५. नैसर्गिक शेती पद्धतीतून विषमुक्त व सकस अन्नधान्य निर्माण करणे व इतर कृषिमाल निर्माण करणे.

६. गावातील पिकांच्या स्थानिक जातींचे संवर्धन करणे.

७. औषधी वनस्पतींची ओळख व लागवड करून देणे.

८. गावातील प्रत्येकाचे आरोग्य चांगले राहण्यासाठी व्यवस्था निर्माण करणे.

९. गावातील नैसर्गिक साधन संपत्तीचे संवर्धन करणे.

१०. पिण्याचे पाणी व सिंचनासाठी पाणी उपलब्ध करणे.

११. पर्यावरणाचे रक्षण करणे.

१२. योग व वेगवेगळ्या क्रीडा प्रकारांसाठी सोयीसुविधा निर्माण करणे.

१३. सांस्कृतिक चळवळीतून जीवन आनंदी करणे.

१४. गो संवर्धन चळवळ राबविणे व पशुसाधनांचा उत्पन्नासाठी योग्य वापर करणे.

१५. विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करणे.

१६. गाव प्रगतीपथावर नेण्यासाठी स्थानीक नेतृत्व निर्माण करणे.

१७. गावातील शेतमालावर प्रक्रिया करण्याचे प्रशिक्षण देणे व त्या आधारावर उद्योग उभारणे.

१८. कृषि माल व बचत गटांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे.

१९. गावातील नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर करून पाणलोट व्यवस्थापन करणे.

२०. गाव तंटामुक्त करणे.

२१. गावात स्वछता मोहीम राबविणे.

## सिंधुदुर्ग जिल्हा कृषि प्रतिष्ठान

सिंधुदुर्ग जिल्हा कृषि प्रतिष्ठान ही संस्था गेली वीस वर्षे शेतकरी व ग्रामीण विकास या विषयावर प्रभावीपणे काम करत आहे. गाव समृद्ध होण्यासाठी वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये तंत्रज्ञान प्रसार व ग्रामीण संघटन या बाबतीत प्रभावी काम सातत्याने केलेले आहे. यासाठी सिंधुदुर्ग जिल्हा कृषि प्रतिष्ठान अंतर्गत भारत सरकार पुरस्कृत कृषि विज्ञान केंद्र (KVK) व महाराष्ट्र शासन पुरस्कृत कृषि महाविद्यालय व कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय यांचा उपयोग होत आहे.

समृद्ध व आनंदी गाव प्रकाल्पामध्ये लोकसहभागातून गावचा विकास करून उत्पन्न व उत्पादकता वाढवण्यावर भर आहे. शाश्वत पद्धतीने उपजीविकेची सुरक्षितेता करिता नैसर्गिक शेती पद्धतीवर भर देण्यात आला आहे. गावातील लोकांना वेगवेगळ्या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देऊन त्यांचे कौशल्य व ज्ञान वाढविण्यात येत आहे. दीर्घकालीन शाश्वत रोजगार निर्मिती, कृषि आधारित अर्थव्यवस्था करून कृषि व पशुधन विकास करण्यात येत आहे.

समृद्ध गाव प्रकल्पाची संकल्पना सिंधुदुर्ग जिल्हा कृषि प्रतिष्ठानने मांडलेली आहे. या प्रकल्पामध्ये सिंधुदुर्ग जिल्हा कृषि प्रतिष्ठान ही संस्था मध्यस्थाची (facilitator) भूमिका बजावणार आहे. समृद्ध गाव प्रकल्प यशस्वी होण्यासाठी व प्रकल्पाची अंमलबजावणी करणेसाठी गाव विकास संघाला मदत करण्याचे काम सिंधुदुर्ग जिल्हा कृषि प्रतिष्ठान ही संस्था करेल.

## गाव विकास संघ

हा संघ दर महिन्याला बैठक घेऊन कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे, आढावा घेणे, निधी उपलब्ध करून देणे यांचे नियोजन करेल. गावातल्या सक्षम व नेतृत्व करणाऱ्या लोकांचा हा संघ आहे. हा संघ राजकारण विरहित राहील. समृद्ध गावाची चळवळ रुजवणे व यशस्वी करण्यासाठी प्राधान्याने कोणत्या गोष्टी करणे आवश्यक आहे याचे नियोजन करण्याचे काम हा गट करेल. यासाठी गावची ग्रामपंचायत इतर शासकीय, अशासकीय विभाग, गावातील प्रस्थापित मंडळे यांचे सहाय्य हा गट घेईल. समृद्ध गावात आयोजित करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांसाठी निधी उभारण्याकरता गावविकास गट समिती प्राधान्याने काम करेल. त्यासाठी सुद्धा ते वेगवेगळ्या विभागांची मदत घेतील. गावातले शेतकरी, स्त्रिया, युवक, विद्यार्थी यांना प्रोत्साहित करून प्रत्येक गोष्टीमध्ये भाग घेण्यासाठी तयार करण्याचे काम गाव विकास गट करेल. समृद्ध गावाच्या विकासात प्रत्येक वाडीच्या विकासाचे उद्दीष्ट ठेवून काम करेल. प्रत्येक वाडी ही समृद्ध वाडी होण्यासाठी त्या वाडीचे सुक्ष्म नियोजन गाव विकास संघ करेल. गाव विकास संघास उपगट मदत करेल.


## ग्रामपंचायत

ग्रामपंचायत हे गाव विकासाला दिशा देणारे मुख्य केंद्र आहे. गावचे सरपंच, ग्राम पंचायत सदस्य यांनी गावाच्या विकासाचे धोरण ठरवणे, त्यासाठी निधि उपलब्ध करून देणे व विकासकामाची अंमलबजावणी करणे ही महत्वाची भूमिका ग्रामपंचायतीने पार पाडणे अपेक्षित आहे. आपला गाव आनंदी आणि समृद्ध बनवण्यासाठी आपल्या नेहमीच्या कामासोबतच पुढील बाबी करणे. गाव विकास गटाची स्थापना करणे. महिन्यातून एकदा बैठक घेणे. समृद्ध गाव योजना बनवण्यासाठी सहभाग घेणे. योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी पुढाकार घेणे. योजनेसाठी निधी उभारण्यास मदत करणे. सर्व शासकीय विभागांना समृद्ध गाव योजनेत सहभागी करणे व मदत करणे. शेतकरी, विद्याथी सहली आयोजित करणे. प्रशिक्षणासाठी लागणारा निधी स्वत:च्या किंवा जिल्हा परिषद योजनेतून उभा करणे. विकास गटामध्ये चर्चा करून ग्रामपंचायतीचा सहभाग निश्चित करणे. समृद्ध गाव प्रकल्प आपल्या गावात राबविण्यासाठी ग्रामसभेचा ठराव तसेच इतर वेळोवेळी लागणारे ठराव ग्रामपंचायतीने उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे.



## शिक्षक वर्ग

शिक्षक हे गावामध्ये गावातील लोक व विद्यार्थी या मधील एक उत्तम दुवा आहे. त्यामुळे समृद्ध गाव चळवळीमध्ये शिक्षकांनी भाग घेतला तर गावातील अनेक विद्यार्थी या चळवळी मध्ये जोडले जातील व विद्यार्थ्यांचा सहभाग गाव विकासामध्ये मिळेल. सर्व शाळा शिक्षणाबरोबरच उत्पादनाची केंद्रे बनली पाहिजेत. त्यासाठी शाळेशी निगडीत पालकांचा बचत गट बनवून त्यांचे साहाय्य घेण्यात येईल. समृद्ध गाव चळवळ यशस्वी करण्यासाठी शिक्षकांचा मोलाचा वाटा राहील. पुढील गोष्टी शिक्षकांच्या नेतृत्वाखाली करण्यात येतील. विद्यार्थ्यांची आरोग्य चाचणी करणे व विद्यार्थ्यांचे आरोग्य कार्ड संगणकाद्वारे बनवणे व नोंद करणे. पौष्टिक भाजीपाला व फळभाज्यांचे उत्पादन करणे. त्यासाठी पालक बचत गट व विद्यार्थ्यांचा उपयोग करणे. प्रशिक्षण देणे व विद्यार्थ्यांसाठी व गावासाठी क्रीडा स्पर्धा आयोजित करणे. कलेचे प्रशिक्षण देणे, कला स्पर्धा आयोजित करणे. चांगले वक्ते बोलवून विद्यार्थ्यांचे व पालकांचे प्रबोधन करणे. सांस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन करणे. आधुनिक तंत्रज्ञान व संगणकीय शिक्षण देणे. पालक गटाचा उपयोग करून दुपारचा पौष्टिक आहार बनविणे.




## बचत गट

महिला बचत गटाच्या माध्यमातून गावातील मनुष्यबळाच्या संघटनाचे काम प्रभावीपणे होऊ शकते. तसेच नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर करून विविध उत्पादने तयार करण्याचे काम बचत गट करू शकतो. त्या माध्यमातून गावामध्ये आर्थिक उलाढाल वाढेल व गावातील प्रत्येक कुटुंब आर्थिक दृष्ट्या संपन्न होण्यास मदत होईल. बचत गटांनी पुढील बाबींमधून उत्पादन वाढवणे अपेक्षित आहे. नैसर्गिक शेती करणे. शेतीमालाची प्रक्रिया करणे. कुटीर उद्योग उभारणे. सर्व मालाची विक्री सिंधुदुर्ग जिल्हा कृषि प्रतिष्ठानच्या तज्ञांच्या सल्ल्यानुसार व त्यांनी बनविलेल्या विक्री आराखड्यानुसार करण्यात येईल. कुक्कुटपालन, शेळीपालन, मत्स्यपालन करणे. गो शाळा उभारणे. हस्तकलाचे प्रशिक्षण घेऊन विक्रीसाठी माल तयार करणे. संगीत नाटक तसेच इतर कला शिकणे व स्पर्धांमध्ये भाग घेणे. पौष्टिक आहार शाळेच्या मुलांसाठी तयार करणे. प्रत्येक महिलेने दररोज 'योगा' किंवा इतर व्यायाम करून आपली क्षमता वाढवली पाहिजे. तसेच सकस आहार घेऊन ॲनिमिया हद्दपार केला पाहिजे.

## नेहरू युवा मंडळ

प्रत्येक गावात नेहरू युवा मंडळ स्थापन करण्याची सरकारी योजना आहे. तिच्याबरोबर संलग्न राहून गावात किंवा वाडीत ही मंडळे स्थापन करण्यात यावीत. त्यांनी आपले काम व उद्दिष्टे बनवावीत. त्यात प्रामुख्याने युवकांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करणे. क्रीडा स्पर्धा आयोजित करणे, सांस्कृतिक प्रशिक्षण व सांस्कृतिक कार्यक्रम व स्पर्धांचे आयोजन करणे, गावामध्ये आरोग्य सेवा बळकट करण्यासाठी साहाय्य करणे. गावामध्ये संगणक साक्षरता निर्माण होण्यासाठी सोयी सुविधा उपलब्ध करणे. विविध स्पर्धांचे आयोजन करणे, सहलीचे आयोजन करणे, प्रत्येक क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींची व्याख्याने गावातील लोकांसाठी व विद्यार्थ्यांसाठी आयोजित करणे, कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण आयोजित करणे, स्पर्धा परीक्षा केंद्र, माहिती व प्रशिक्षण केंद्र गावामध्ये स्थापन करणे.





# समृद्ध गावातील विकासाच्या संकल्पना



## रोजगार

रोजगार निर्मितीसाठी कृषि व कृषिवर आधारित उद्योगांचा प्रामुख्याने विचार करावा लागेल. यामध्ये नैसर्गिक शेती, कृषि सेवा व सल्ला, रोपवाटिका व्यवस्थापन, फळबाग व्यवस्थापन, भाजीपाला शेती, फुलशेती, प्रकियाउद्योग, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, शोभिवंत मत्स्यपालन, बिजोत्पादन, कडधान्य लागवड, तेलबिया लागवड, औषधी वनस्पती लागवड, वैरण विकास, कृषि माल विक्री व्यवस्था, माती परीक्षण, कृषि पर्यटन अशा प्रकारच्या बाबींचा समावेश करता येईल. ही बाब गावातील वाडीवार करण्यात येईल. त्यासाठी समृद्ध वाडी विकास केंद्र स्थापन करण्यात येईल. त्यात खालील बाबी करण्यात येतील.

## समूह शेती

गावामध्ये असणारी तुकड्या तुकड्यांची असणारी शेती एकत्रित करून समूह शेती करण्यासाठी शेती गाव तयार करण्यात येतील. दुसरीकडे, जमिनीच्या विखुरलेल्या तुकड्यामुळे शेती व्यवसायात यांत्रिकीकरण आणणे अशक्य झाले आहे. त्यातच बहुसंख्य जमीन मालक काम धंद्यानिमित्त शहराकडे वळले. त्यामुळे गावाकडे शेती करायला फारशी माणसे उरली नाहीत. ही परिस्थिती बदलायला पाहिजे. म्हणूनच आम्ही समृद्ध गावाची संकल्पना अस्तीत्वात आणली आहे.

## नैसर्गिक शेती

दिवसेंदिवस रासायनिक खतांचा असंतुलित वापर शेतात मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे जमिनीची सुपीकता कमी होत चालली आहे. सिंधुदुर्ग जिल्हा कृषि प्रतिष्ठान गावागावामध्ये नैसर्गिक शेतीचा प्रसार करत आहे. शेती मध्ये घनजीवमृत, जीवामृत, बिजामृत, निमास्त्र, अग्निअस्त्र, दशपणी अर्क इत्यादींचा वापर व गांडूळखत निर्मिती यावर शेतकऱ्याना प्रशिक्षण देऊन त्यांना त्याकडे प्रवृत्त करत आहे. गावाच्या जमिनीचे आरोग्य व नागरिकांचे आरोग्य जपण्यासाठी नैसर्गिक शेती पद्धतीने प्रतिष्ठानने प्रात्यक्षिके घेतली आहेत. नैसर्गिक शेतीवर प्रशिक्षण व प्रात्यक्षिके आयोजित करण्यासाठी गाव, कृषि विज्ञान केंद्रा सोबत काम करेल व नैसर्गिक शेतीचे गट स्थापन करतील.

## लघू उद्योग

दैनंदिन लागणाऱ्या गरजेच्या वस्तूंची निर्मिती जसे साबण, टूथपेस्ट, उदबत्ती, घरगुती मसाले, भाकरी, पीठ, तेल, तांदूळ, तृणधान्य, कडधान्य, डाळी, फळे, भाजीपाले इ. गावातच तयार करण्यात येतील. अशा प्रकारच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी गावातच निर्माण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. गावात निर्माण होणाऱ्या प्रत्येक गोष्टीची जबाबदारी घेण्यासाठी गावात कुशल माणसे तयार करण्याचे काम गाव विकास गट करेल. त्यात वाडी विकास गट पुढाकार घेईल.

## शिक्षण

गावामध्ये गुणवत्ता पूर्ण शिक्षण मिळण्यासाठी सोयी सुविधा निर्माण करणे. त्यासाठी गावातील मुंबई मंडळाची मदत घेऊन गावात एक शैक्षणिक संघ स्थापन करणे. उपयुक्त शिक्षण देवून लोकांमध्ये नवीन विचार रुजविणे. ज्ञान व कौशल्य आधारित शिक्षण पद्धतीचा अवलंब करणे.

समृद्ध गाव ही संकल्पना राबविताना गावामध्ये राबवायच्या उपक्रमांचे नियोजन करण्यासाठी तसेच गावातील लोक व शासन, स्वयंसेवी संस्था यांच्यामध्ये समन्वय साधण्यासाठी गाव विकास संघ स्थापन करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. गाव विकास समिती अंतर्गत प्रत्येक विषयाचा पाठपुरावा करण्यासाठी वाडी विकास गट व उत्सुक लोकांचा एक उपगट तयार करण्यात येईल.



## कृषि आधारीत उद्योग

रासायनिक शेतीमुळे कर्करोग, मधुमेह, हृदयविकार, रक्तदाब असे विकार वाढू लागले आहेत. शेती उध्वस्त होऊ लागली आहे. दिवसेंदिवस रासायनिक खते आणि किटकनाशकांचा वापर वाढत आहे. किटकांची प्रतिकारशक्ती वाढत गेली. परिणामत: रासायनिक खतांचा आणि किटकनाशकांचा वापर वाढतच गेला व शेतीमध्ये गुंतवणूक वाढली. त्यामानाने उत्पन्न वाढले नाही. रासायनिक कृषि निविष्ठांसाठी कर्ज घेण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होत गेला आणि आत्महत्येचे पर्व सुरु झाले. नैसर्गिक शेती ही मानवी जीवनातील नवीन शाश्वत जीवन शैलीचा महामार्ग आहे.

कृषि प्रतिष्ठानने नैसर्गिक शेती प्रसार, कृषिमाल प्रकिया व विक्री तसेच महिला बचत गट सक्षमिकरण यामध्ये विशेष पुढाकार घेतला आहे. तसेच प्रामुख्याने शेतकऱ्याना सामूहिक शेतीसाठी प्रोत्साहन देणे व त्याबद्दल त्यांना सुयोग्य मार्गदर्शन करणे, कृषीमाल प्रकियेसाठी सोयी सुविधा निर्माण करणे, कृषि माल विक्री व्यवस्था निर्माण करणे आणि हे सर्व करीत असताना पर्यावरणाचे संवर्धन करणे अशा बाबींचा समावेश आहे. त्यामध्ये प्रामुख्याने कृषि+फळबाग+भाजीपाला, कृषि+वनशेती, कृषि+जोडधंदे, शेती +विक्री व्यवस्था, कृषि+पशुपालन, कृषि+कुक्कुटपालन अशा पद्धतीने कृषिवर आधारित गावचा विकास करता येईल.

## पशुसंवर्धन


गावामध्ये दिवसेंदिवस पशुसंवर्धनावर दुर्लक्ष होत आहे. जमिनीच्या आरोग्याची व पिकाच्या उत्पादकतेसाठी लागणाऱ्या गोमूत्र, शेणखत, लेंडीखत, विष्ठा यांचे प्रमाण कमी होत आहे. गावागावात दुग्ध व्यवसाय चालला पाहिजे व गाव तिथे डेअरी असली पाहिजे. दुधाची प्रकिया गावातच झाली पाहिजे. यासाठी गावठी गायीवर आधारित दुग्धव्यवसाय तंत्रज्ञान लोकांपर्यत गावोगावी पोहचविण्यासाठी कृषि प्रतिष्ठान आटोकाट प्रयत्न करत आहे. नैसर्गिक शेती मध्ये पशुसंवर्धन व्यवसाय हा जोड व्यवसाय म्हणून शेतकऱ्यांकडे असणे गरजेचे आहे.गावातील प्रत्येक कुटुंबांकडे गोसंवर्धन करण्यासाठी गाव विकास गट विशेष प्रयत्न करेल. तसेच सामूहिक गोशाळा गावात निर्माण होण्यासाठी लक्ष देण्यात येईल. कुक्कुटपालन, शेळीपालन, अशा माध्यमातून रोजगार निर्माण करण्यावर भर दिला जाईल. पशुसंवर्धन साधनांचा विकास करणे अपेक्षित आहे.



## पिण्याचे व सिंचनाचे पाणी

प्रत्येक गावामध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या दिवसेंदिवस जटिल होत आहे. प्रत्येक गावात योग्य गुणवत्ता असलेले पिण्याचे पुरेसे पाणी उपलब्ध करण्याची व्यवस्था करण्यात येईल. शेतीमध्ये सिंचन हा अतिमहत्वाचा घटक आहे. सिंचनासाठी कोकणात पंचक्रोशी केंद्र धरून छोटी धरणे, केटी बंधारे, जलविद्युत प्रकल्प आणि पाणी अडवा पाणी जिरवा असे कार्यक्रम उभे राहिले पाहिजेत. पूर्ण जमीन पाण्याखाली आणणे याला सर्वात जास्त प्राथमिकता दिली पाहिजे. यासाठी प्रत्येक समूहाची योजना बनविण्यात येईल.

## आरोग्य



समृद्ध व संपन्न गाव होण्यासाठी गावातील सजीवांचे आरोग्य व्यवस्थापन चांगले असले पाहिजे. माणसांच्या व प्राण्यांच्या आरोग्याची चांगल्या प्रकारे काळजी घ्यावी लागेल. त्यासाठी पुढील गोष्टी करण्यात येतील. पोषण आहाराची शेती केली जाईल. औषधापेक्षा आजार होवूच नये यासाठी रोग प्रतिकार शक्ति नागरिकांमध्ये वाढली पाहिजे ह्यावर भर दिला जाईल. पोषण आहाराच्या निर्मितीसाठी पीक पद्धती विकसित केली जाईल. भाजीपाला व कडधान्यासाठी परसबाग तयार करण्यात येईल. काजू, कोकम, जांभूळ, फणस, पपई, केळी, नारळ, सुपारी, औषधी वनस्पतीची लागवड आणि फळ प्रक्रिया पदार्थ करण्यासाठी बचत गट स्थापन केले जातील. गावातील लोकांचे सर्व्हेक्षण करून आरोग्य पत्रिका बनवण्यात येईल व त्यांच्यासाठी आरोग्य शिबीर आयोजित करून सर्वांची आरोग्य चाचणी करण्यात येईल. गावाच्या आरोग्य संपन्नतेसाठी कृषि प्रतिष्ठान मार्फत गावोगावी जाऊन आरोग्य व योग शिबिरे घेतली जातील. पशुपक्षांच्या आरोग्यासाठी जनावरांची आरोग्य शिबिरे घेऊन त्यांच्यावर औषधोपचार करण्यात येईल. गावातील घन कचऱ्याचे नियोजन करून त्यांचे खत आणि वीज निर्मितीसाठी प्रशिक्षणे घेतली जातील. या सर्व प्रक्रियेत नैसर्गिक शेतीवर आधारीत अन्न धान्याचे सेवन करणे अत्यावश्यक आहे. शरीरात रसायन जाणे म्हणजे रोगराईला आमंत्रण देणे. गावागावात एका डॉक्टरच्या अध्यक्षतेखाली आरोग्य संघ बनवण्यात येईल. त्यात योग, क्रीडा तज्ञ, नैसर्गिक शेती तज्ञ, आहार तज्ञ, वैद्य तज्ञ काम करतील. सुदृढ पशू संघ स्थापन करण्यात येईल. यामध्ये जनावरांच्या डॉक्टर च्या अध्यक्षतेखाली गावातील जनावराचे वैद्य यांची संघटना करण्यात येईल.

## क्रीडा

गाव विकास संघात क्रीडा विकास गट स्थापन करण्यात येईल. मानवाच्या आरोग्यासाठी व सुदृढ जीवन घडविण्यासाठी क्रिडा क्षेत्राचे स्थान मोठे आहे. विविध खेळांच्या माध्यमातून माणसाचे शरीर व मन सुदृढ होण्यास मदत होते. मानवाने आपल्या सुदृढ जीवनासाठी वैयक्तिक खेळ खेळणे गरचेचे आहे. यासाठी सिंधुदुर्ग जिल्हा कृषि प्रतिष्ठानद्वारे गावोगावी खेळांच्या स्पर्धांचे आयोजन करून लोकांना महत्व पटवून देण्यात येते. यामध्ये विशेषत: कराटे, तायक्वांदो, कबड्डी, लंगडी, खो–खो, फुटबॉल, बॉक्सिंग, क्रिकेट, कॅरम, बुद्धिबळ इ. खेळ असतील तसेच गाव विकास गटाने निश्चित केलेले खेळ घेण्यात येतील. महिलांसाठी विशेष खेळ योजना बनवण्यात येईल व स्पर्धा ठेवण्यात येतील. त्यात सर्व महिलांनी भाग घेणे अनिवार्य असेल. योगासाठी प्रशिक्षक तयार करून वाडी–वाडीवर योगवर्ग घेण्यात येतील. तसेच समूहाने रोज व्यायाम करण्याची सवय लावून घेतली पाहीजे.

## संस्कृती

गाव विकास सांस्कृतिक संघ बनवण्यात येईल. त्यात सर्व बचत गटांचे, युवा संघाचे आणि महिलांचे प्रतीनिधी काम करतील. संपन्न व समृद्ध जीवनाचा उपभोग घेण्यासाठी प्रत्येक गावाची संस्कृती जोपासणे काळाची गरज आहे. त्याच्याबरोबर बाहेरील संस्कृतीचे अवलंबन करणे जरुरीचे आहे. वाईट सवयी सोडणे. द्वेष निर्माण करणारे रिती रिवाज मोडणे. प्रेम भावना, सामुहिक विकास करणाऱ्या रूढी जोपासने. उपयोगी नसलेल्या पारंपरिक चालीरीतीना आळा घालणे. तरुण पिढीवर चांगले सुसंस्कार घडविण्यासाठी गावातील युवकांचे व्यक्तिमत्व, कला व विचार विकसित करणे. तरुण तरुणींना संस्कारक्षम जीवन जगण्यासाठी प्रवृत्त करणे. सांस्कृतिक चळवळ रुजवण्यासाठी अभिनय, गायन, वादन, रंगकाम, हस्तकला, लोककला यांचे प्रशिक्षण व स्पर्धा आयोजित करणे. एकंदरीत मानव कल्याणसाठी संस्कृती जोपासणे व आनंद निर्माण करणे.

## जमिनीचे आरोग्य

जमीन हा संपूर्ण सृष्टीचा मूलभूत आधार आहे. भविष्यात अन्नधान्याची सुरक्षितता जोपासण्यासाठी जमिनीचा योग्य वापर करून शाश्वत व्यवस्थापन करावे लागेल. तसेच पाणी, माती व जैवविविधता यांचे संवर्धनाविषयी उपाययोजना राबवून प्रात्यक्षिकासह जनजागृती संस्थेतर्फे करण्यात येत आहे. कृषि विज्ञान केंष्ठातर्फे सध्या मृद आरोग्य या विषयावर गावागावात जागृती करण्यात येत आहे. कृषि विज्ञान केद्र मृद आरोग्य जागृतीसाठी विशेष काम करेल.



## पर्यावरण

गावात पर्यावरण विकास गट स्थापन करावा. सध्या गावागावामध्ये जंगल तोड होत असल्यामुळे नैसर्गिक साधन संपतीचा वेगाने ऱ्हास होत आहे. त्याचा परिणाम स्थानिक पर्यावरण व जंगली प्राण्यांवर झालेला आहे. गावातील पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी पर्यावरण संघ बनवण्यात येईल. संघामार्फत पुढील काम करू शकतो. गावातील वीज गावातच निर्माण करण्यात येईल. गावातील घनकचरा, जनावरांची व पक्षांची विष्ठा याचा खत आणि वीज निर्मितीसाठी वापर करता येईल. गावतील वीज, पिण्याच्या व शेतीच्या पाण्याची बचत करण्यासाठी नियम बनवण्यात येतील. लाकूडतोडीवर बंदी आणावी लागेल. लाकूडफाट्याचा जेवणासाठी इंधन म्हणून होणारा वापर कमी करणे. त्यासाठी बायोगॅस व गोबर गॅस कार्यान्वित करावा लागेल. जंगली वनस्पतींची पुन्हा लागवड करून जंगले समृद्ध करण्यासाठी उपययोजना करण्यात येतील. चांगल्या झाडांची लागवड खाजगी आणि सार्वजनिक ठिकाणी करण्यात यावी. त्यासाठी युवा मंडळाने पुढाकार घेणे अपेक्षित आहे.



मुख्य संकल्पना
ब्रिगे. सुधीर सावंत
अध्यक्ष
सिंधुदुर्ग जिल्हा कृषी प्रतिष्ठान

मार्गदर्शक
प्रदिप सावंत
उपाध्यक्ष
सिंधुदुर्ग जिल्हा कृषी प्रतिष्ठान

दिनानाथ वेरणेकर
सचिव
सिंधुदुर्ग जिल्हा कृषी प्रतिष्ठान

प्रकाशक
भास्कर काजरेकर
वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख
कृषि विज्ञान केंद्र

मुख्य संकलक
डॉ. विलास सावंत
शास्त्रज्ञ कृषि विस्तार
कृषि विज्ञान केंद्र

सह संकलक
बाळकृष्ण गावडे
विकास धामापूरकर
डॉ. केशव देसाई
विवेक सावंतभोसले
सुमेधा तावडे
मंगेश पालव
नरेंद्र सावंत




# सिंधुदुर्ग जिल्हा कृषि प्रतिष्ठान, किर्लोस
## कृषि विज्ञान केंद्र, सिंधुदुर्ग

पो. किर्लोस, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग, महाराष्ट्र, पीन: ४१६ ६१६
+९१ ९४२२२ ४९०१८ kvksin@rediffmail.com
www.kvksinfarmsciencecentre.org